MHRG100005292026

**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ३४२/२०२६**

**भारतीय नागरीक सुरक्षा संहिता (२०२३ चा अधिनियम क्र. ४६) अन्वये गुन्हयाचे विवरण**

**यु. एम. जाधव, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, महाड यांचे न्यायालयात**

| | | |
|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | – ११/०६/२०२६ |
| २. | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | – ११/०६/२०२६ |
| ३. | तक्रारदाराचे नाव | – **सरकारतर्फे महाड तालुका पोलीस ठाणे.** |
| ४. | आरोपीचे नांव | – **नितीन सदा जाधव,** |
| | वय | – ३१ वर्षे, |
| | राहणार | – कोतुर्डे (सोनारवाडी), पोस्ट वरंडोली, ता. महाड, जि. रायगड. |
| ५. | गुन्हयाचे विवरण | – |

दिनांक ११/०६/२०२६ रोजी २०.३१ वाजताचे सुमारास मौजे तुडील फाटा येथे म्हाप्रळ ते महाड जाणारे सार्वजनिक रोडवर, ता. महाड, जि. रायगड येथे तुम्ही तुमच्या ताब्यातील पॅशन प्रो मोटरसायकल क्रमांक एमएच–०६/बीएस–७२९८ हे वाहन अतिवेगाने चालवुन आरोपीकडे वाहन परवान्याची मागणी केली असता, आरोपीच्या तोंडाचा उग्र वास आल्याने आरोपीने कोणतेतरी माद्रक द्रव्य सेवन केल्याचा संशय आल्यामुळे आरोपीला ब्रेथ ॲनलायझर मशीनद्वारे फुंक मारण्यास सांगुन तपासणी केली असता, ८६.० mg/१०० ml मिळुन आले म्हणून तुम्ही आरोपीने मोटार वाहन कायदा, १८८८ चे कलम १८५ अन्वये गुन्हा या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये केला.

JADHAV UDAY MAHADEV
Digitally signed by JADHAV UDAY MAHADEV Date: 2026.07.30 12:35:02 +0530

महाड,
दिनांक – ३०/०७/२०२६

(यु. एम. जाधव)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, महाड

**आरोपीचे प्रतिकथन** –

प्रश्न क्र. १ – तुम्हाला पोलीस टिपणाच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर – होय.

प्रश्न क्र. २ – तुमच्या ठेवण्यात आलेला दोषारोप तुम्हाला वाचुन दाखविला व तो तुम्हाला समजला काय ?

उत्तर – होय.

प्रश्न क्र. ३ – तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?

उत्तर – होय.

-------------

आरोपीची सही / अंगठा

JADHAV UDAY MAHADEV
Digitally signed by JADHAV UDAY MAHADEV
Date: 2026.07.30 12:35:08 +0530

महाड,
दिनांक – ३०/०७/२०२६

(यु. एम. जाधव)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, महाड

## **न्या य नि र्ण य**

सदर आरोपी विरुध्द मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम १८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आज रोजी आरोपीने न्यायालयात सदर प्रकरणात स्वच्छेने गुन्हा कबुल करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. आरोपीने गुन्हा कबुल केल्यांनतर होणाऱ्या परिणामाची जाणीव करुन देण्यात आली. त्यानंतर देखील आरोपीने स्वतःच्या स्वमर्जीने गुन्हा कबुल केला आहे. सहाययक सरकारी वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वरील प्राप्त परिस्थिती लक्षात घेतली असता, सरकार पक्षाची तक्रारमधील कथने निर्विवादपणे सिध्द झालेली आहेत. त्यामुळे आरोपीला सदर गुन्हयाकरिता दोषी धरण्यात येत आहे. त्यामुळे आरोपीला सदर गुन्हयाकरिता दोषी धरण्यात येत आहे. आरोपीने शिक्षेबाबत दया दाखविण्याची विनंती केली. त्याने नमुद केले की, तो घरातील एकमेव कमविता व्यक्ती आहे. आरोपीने केलेली विनंती, आरोपीचे वय, गुन्हयाचे स्वरुप लक्षात घेता, आरोपीला द्रव्यदंडाची शिक्षा देणे न्यायोचित होईल. करिता खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

# आ दे श

**१.** आरोपी यांस भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७५ अन्वये मोटार वाहन कायदा कलम १८५ चे गुन्हयाकरिता दोषी धरुन सदर गुन्हयाबद्दल आरोपीला एकुण रक्कम रु. १०,०००/– (अक्षरी दहा हजार रुपये मात्र) द्रव्यदंड ठोठावण्यात येत आहे. आरोपीने सदर दंडांची रक्कम न भरल्यास १५ दिवसांची साध्या कारावासाची शिक्षा भोगावयाची आहे.

*(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर)*

JADHAV UDAY MAHADEV
Digitally signed by JADHAV UDAY MAHADEV
Date: 2026.07.30 12:35:18 +0530

महाड, (यु. एम. जाधव)
दिनांक – ३०/०७/२०२६ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, महाड

I affirm that the contents of this P.D.F. file judgment/ order are same, word to word, as per the original judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | :- | Mr. Uday Mahadev Jadhav, $2^{nd}$ Jt. Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Mahad. |
| Name of Stenographer | :- | Mr. B. T. Deshmukh |
| Date of decision / typed | :- | 30/07/2026 |
| Judgment / order signed by the P.O. on | :- | 30/07/2026 |
| Judgment / order uploaded on | :- | 30/07/2026 |